“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


॥ अतिस्नेहः पापशङ्की ॥

मूल्य रु. ५


| | | |
|---|---|---|
| क्रमांक ९ | वर्ष : ३८ | एप्रिल–जून २०१६ |

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**

From : The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

**दि एन्.के.जी.एस.बी. संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक**
**संघाच्या सभासदांना सूचना**

संघाची कार्यकारिणी ही निवडून आलेले एक अध्यक्ष आणि आठ सभासद व दोन स्वीकृत सभासद अशा सभासदांची असते. संघाच्या सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०१६ रोजी संपत आहे. तेव्हा ज्या सभासदांना २०१६ ते २०१९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी अध्यक्ष वा कार्यकारिणी सभासद म्हणून काम करायचे असेल, त्यांनी संघाच्या कार्यालयातून छापील अर्ज घेऊन सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसकट अर्ज पूर्ण करून दि. ३० एप्रिल २०१६ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत.

**मुंबई मंच व ठाणे मंच – नव्या कार्यकारिणीची निवड**

मुंबई मंच व ठाणे मंच या उभय शाखांच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०१६ रोजी संपत आहे. पश्चिम व पूर्व उपनगरांत राहणाऱ्या ज्या सभासदांना २०१६ ते २०१९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी कार्यकारिणीवर सभासद म्हणून काम करावयाचे असेल त्यांनी आपली नावे ३० एप्रिल २०१६ पर्यंत अनुक्रमे खालील ठिकाणी सादर करावीत.

| **मुंबई मंच** | **ठाणे मंच : संपर्क** |
|---|---|
| संघ कार्यालय, | सुरेश पालेकर : २५३६४३२८ / ९९६९४५५३७० |
| गिरगांव | मंजिरी कुलकर्णी : २५३३३२९६ / ९६६५०९८११७ |


नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार
**‘नार्थ कॅनरा जी. एस.बी. वृत्तविलास’ त्रैमासिकाचे प्रकटन**
Form IV Rule 8

१. **प्रकाशन स्थळ :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी.रोड, मुंबई ४.

२. **प्रकाशन अवधी :** त्रैमासिक

३. **मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** दत्तात्रय नागेश नाडकर्णी, **राष्ट्रीयत्व :** भारतीय

पत्ता : दि नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४.

४. **मालक :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस्. बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी.रोड, मुंबई ४.

मी, दत्तात्रय नागेश नाडकर्णी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या महितीप्रमाणे खरा आहे.

**मुंबई, १ मार्च २०१६** **दत्तात्रय नागेश नाडकर्णी** – प्रकाशक

## संपादकीय

### सुप्रसिद्ध छायाचित्रकार अतुल कसबेकर यांचे 'नीरजा' द्वारे सिनेक्षेत्रांत अतुलनीय पदार्पण

दिनांक ५ सप्टेंबर १९८६. कराची विमानतळ. सुमारे ३७० प्रवासी व वैमानिकांसह १६ कॅबीन क्रू असलेल्या पॅन ॲम विमानाच्या अपहरणाचा दहशतवाद्यांकडून प्रयत्न. बहुसंख्य प्रवाशांचे प्राण वाचविण्यासाठी स्वत:च्या प्राणाची आहुती देऊन तो प्रयत्न असफल करण्याला जी व्यक्ती कारणीभूत होती ती म्हणजे २३ वर्षीय नीरजा भानोत, मुंबईतील एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलगी. प्रचंड प्रसंगावधान, असामान्य शौर्य, कर्तव्यात अजिबात कसूर नाही अशा नीरजाचे जगभर कौतुक झाले त्यात नवल नाही. तिला शासनातर्फे अशोक चक्र देऊन सन्मानीतही करण्यात आले.

नीरजाची शौर्यकथा रुपेरी पडद्यावर आणण्यासाठी अगदी यथायोग्य होती व त्यासाठी कित्येक दिग्गजांनी शर्थीचे प्रयत्न केले. पण त्यांपैकी कुणालाही तिच्या कुटुंबीयांकडून होकार मिळाला नाही. पण शेवटी कुठल्या निर्मात्याला यश मिळाले माहिती आहे? ती व्यक्ती म्हणजे 'आमगेलो अतुल कसबेकर, संघाचे हितचिंतक अरुण व मंगला (प्रभा) कसबेकर हांगेलो पूत.' अतुल हे छायाचित्रकलेत सुप्रसिद्ध आहेत. 'नीरजा' ही त्यांची पहिली निर्मिती. पहिल्याच प्रयत्नात ती एवढी प्रभावी झाली व लोकप्रिय झाली की जगभरातून पहिल्या तीन आठवड्यांत 'नीरजा'ने रु. १२० कोटीचा जादुई आकडा पार केला. पण या प्रकल्पामागचा खरा जादुगार व सूत्रधार अतुलच आहेत हेही तितकेच खरे.

अतुलच्यांच शब्दांत सांगायचे म्हणजे 'मी नीरजाला एकदाही भेटलेलो नाही. पण या चित्रपट निर्मितीच्या संदर्भात माझ्या इतक्या व्यक्तींबरोबर गाठीभेटी व चर्चा झाल्या की मला भास झाला की मी तिला जन्मापासूनच ओळखतो. आपल्या मुलीवर चित्रपट काढण्यास मोठमोठ्या नामवंतांना स्पष्ट नकार देणारी नीरजाची आई 'रमाजी' ही मला मात्र परवानगी देण्यास तयार झाली. कारण संपूर्ण चित्रपटात नीरजाशी प्रामाणिक राहीन असे मी त्यांना वचन दिले होते व ते मी मनापासून तंतोतंत पाळले. जो निष्णात दिग्दर्शक मोठमोठ्या बॅनरच्या चित्रपटांचे दिग्दर्शन करण्यास नकार देत असे त्याने एका चहाच्या कपावर कथा ऐकल्यानंतर 'नीरजा'चे दिग्दर्शन करण्यास होकार देणे, स्टुडिओ मालकाने आपुलकीने कमी भाडे आकारणे, शबाना आजमी सारख्या प्रतिथयश नटीने 'रमाजी' ची भूमिका अत्यल्प मोबदल्यात साकार करण्यास बिनशर्त अनुमती देणे, विमानतळासह प्रत्येक लोकेशनवर लालफीत झुगारून शुटींग करण्यास सहकार मिळणे, इत्यादी कारणांमुळे चित्रपट बजेटपेक्षा कमी खर्चात व कमी वेळात करणे मला शक्य झाले. जणू नीरजाचा आत्माच आमच्या प्रयत्नांच्या पाठीशी होता.''

नेहमीचा मोह घालणारा भंपकपणा व अतिरंजकता टाळून अतुलने नीरजा जशी होती तशी साकारली. शासनाने हा चित्रपट करमुक्त केला हीच अतुलच्या कर्तृत्वाची उचित पावती.

समस्त कारवारकरांतर्फे अतुलचे हार्दिक अभिनंदन!

**१ एप्रिल २०१६**



## एज्युकेशन सोसायटी – शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

**एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| **१ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी** | **३० जून २०१६** |
| **महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी** | **३० जुलै २०१६** |

**(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील) याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा, ही विनंती.**

**विषय :**

- **संगीत, नाटक, नृत्य**
- **व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण**
- **राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी.ए. कॉस्टिंग, एन.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिस इ)**
- **संगणकावर आधारित प्रशिक्षण**
- **वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास**
- **जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा**
- **शैक्षणिक सहल**

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कर्जाऊ शिष्यवृत्त्या :** उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (प्रतिवर्षी १,००,०००)
परदेशातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी :** गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करुन शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
शैक्षणिक पात्रता : बारावी

विशेष माहितीसाठी कार्यालयात येऊन चौकशी करावी अथवा २३८७७३०१ वर कार्यालयीन वेळांत संपर्क साधावा.

## प्रकाश झोत

### 'अवेळ'अरुण वर्टी यांच्या कथासंग्रहाला महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून अनुदान

कांदिवली येथे राहणारे श्री. अरुण शंकर वर्टी हे व्यवसायाने रसायन व औषध निर्मिती क्षेत्राशी संबंधित. त्यांना ललित साहित्यात विशेष रस आहे. गेल्या चाळीस वर्षांच्या कालखंडात त्यांनी अनेक कथा लिहिल्या आहेत. त्यांतील तेरा निवडक कथांचा संग्रह 'अवेळ' हा अलीकडेच प्रकाशित झाला आहे. यातील कथा अगदी सामान्य माणसांच्या जीवनांत नेहमी घडणाऱ्या प्रसंगांवर आधारित आहेत. सामान्य व्यक्तींच्या इच्छा, आकांक्षा, मनोव्यापार यासंबंधीच्या या कथा आहेत.

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेत अनुदान मिळाले आहे. यावरूनच या कथांचा दर्जा लक्षांत येतो.

### अग्निशामक दलाचे दीपक गायतोंडे यांना मुंबई महानगरपालिकेकडून शौर्यपदक

ठाणे येथे राहणारे श्री. दीपक जगन्नाथ गायतोंडे हे मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशामक दलांतून Jt. Chief Fire Officer या हुद्यावरून २००८ साली ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. २००७ साली त्यांनी घाटकोपर येथील एका भीषण आगींत आपल्या सहकाऱ्यांसह ३५ जणांचे प्राण वाचविले. त्यांच्या या असामान्य शौर्याची दखल घेऊन म्युनिसिपल कमिशनर श्री. सीताराम कुंटे यांनी गेल्या वर्षी श्री. गायतोंडे यांना शौर्य पदक देऊन त्यांचा जाहीर सत्कार केला.

अनेक खतरनाक आगींशी त्यांनी झुंज दिलेली आहे व अनेकांचे प्राण वाचविले आहेत. २००६ सालच्या साखळी बॉम्ब स्फोटाच्या घटनेत जोगेश्वरी स्टेशनच्या परिसरात हाहा:कार झाला होता तेव्हा तेथील गंभीर परिस्थिती पूर्ववत आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.


१९८८ साली रोटरी क्लब नॉर्थ यांच्यातर्फे तेव्हाचे महाराष्ट्राचे मंत्री मर्जबान पत्रावला यांच्या हस्ते त्यांच्या निष्ठापूर्वक कार्यक्षमतेसाठी प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता. शिवाजी पार्क येथे प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी कवायती होतात त्यात अग्निशामक दलाच्या पथकाचे परेड कमांडर म्हणून त्यांना सलग पाच वर्षे प्रथम पारितोषिक मिळाले होते.

### आपल्या बँकेच्या शाखांचे शतक

आपल्या बँकेने २७ फेब्रुवारी रोजी पुण्यात मार्केट यार्ड येथे नवीन शाखा उघडून शाखांचे शतक गाठले. या शाखेचे उद्घाटन बोरकर अँड मुझुमदार या कंपनीचे भागीदार श्री. दिलीप मुझुमदार यांच्या हस्ते झाले. योगायोगाची गोष्ट म्हणजे बँकेची पहिली शाखा १९१७ साली गिरगांव येथे सुरु झाली तेव्हांचे बँकेचे पहिले अध्यक्ष होते हळगेचे शेठ शांताराम कुलकर्णी. आतां शंभरावी शाखा सुरु झाली तेव्हांसुद्धा बँकेचे अध्यक्ष आहेत हळगेचेच श्री. किशोर कुलकर्णी!




आपल्यासाठी भक्तीचा एक स्वर्णिम अनुभव !



श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहालसा आणि श्रीनागेश

यांच्या फायबरच्या मूर्ती टिकाऊ सोन्याच्या प्लेटिंगसह उपलब्ध

वास्तुशास्त्राप्रमाणे घडविलेली 'तोरणलक्ष्मी'
तसेच गणेश, लक्ष्मी, सरस्वती आणि कुबेर यांच्या
मूर्तीसुध्दा उपलब्ध आहेत.

संपर्कः
चंद्रशेखर सुनील खांडाळेकर, जे/६ शारदाश्रम, भवानीशंकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२८
फोन - ९८१९५ २३५५१ / ९८६७३ ५१६७३
facebook page-Holygold

## शूटिंग असेही, शूटिंग तसेही.....!
### दीपा पिकळे चव्हाण यांची कन्या जुई हिची यशोगाथा

'शूटिंग,' हा शब्द उच्चारला, की नजरेसमोर दोन दृश्यं तरळतात! 'सिनेमा, त्यातील नट-नट्या-दिग्दर्शक, कॅमेरामन-स्पॉट-बॉईज्' वगैरे, हे पहिलं दृश्य आणि 'बहुजनहिताय, देशरक्षणाय' हातात बंदूक घेऊन सज्ज असणारे जवान, पोलिस वगैरे, हे दुसरं दृश्य!

पण या लेखाचा प्रपंच ज्या शूटिंगबद्दल आहे, ते सर्वस्वी वेगळंच आहे. पंधरा-सोळा वर्षांच्या, दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने हातात कॅमेरा घेऊन केलेलं स्वच्छ भारत-अभियानाचं शूटिंग आणि विद्यार्थ्यांसाठी असलेल्या पिस्तूल-शूटिंगच्या स्पर्धेत भाग घेऊन तिच्यात केलेलं शूटिंग याचा हा छोटासा वृत्तांत!

या दोन्ही कला जिने साध्य केल्या आहेत, अशी ही विद्यार्थीनी म्हणजे, 'जुई चव्हाण', श्री. जतीन्द्र व कै. सौ. सुधा पिकळे यांची नात, आणि ॲडव्होकेट सौ. दीपा व सॉलिसिटर श्री. प्रशान्त चव्हाण यांची कन्या.

दोन वर्षांपूर्वी जुईची ओळख मुखपत्रिकेच्या वाचकांना झालेली आठवत असेल. नोव्हेंबर २०१३ मध्ये हैदराबाद येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय बाल-चित्र-महोत्सवात तिच्या 'दि एमरल्ड वर्ल्ड' या फिल्मची निवड झाली होती. त्या संबंधात हा परिचय होता. तिची हीच फिल्म नंतर 'सेऊल (द. कोरिया)' येथील सोळाव्या 'सेऊल इंटरनॅशनल यूथ फिल्म फेस्टिवल' मध्ये निवड होऊन प्रदर्शित केली गेली.

अलीकडे (नोव्हेंबर २०१५ मध्ये) जुईच्या शिरपेचात आणखी एक मोरपीस लागलं. "Metamorphosis-My Story" या तिच्या फिल्मची निवड 'The 19th Golden Elephant, International Children's Film Festival of India' या महोत्सवासाठी झाली. हा महोत्सव CFSI आणि तेलंगण सरकारच्या विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

दादरच्या शिवाजी पार्कजवळील 'डॉ. बी. एम. राऊत' या मार्गाची वाईट अवस्था पाहून तेथील विख्यात 'बालमोहन विद्यामंदिर' या विद्यालयाने 'स्वच्छ भारत अभियान' या मोहिमेअन्तर्गत विद्यार्थ्यांसाठी एक आगळा उपक्रम राबविला. त्यांनी स्वत:च्या हातांनी रस्ता साफ केलाच. शिवाय, पादचारी मार्गही स्वच्छ करून रंगविला, झाडं सुशोभित केली. 'e-collection-bin' बसवून रस्त्याचं रूप पालटून टाकलं. विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनात स्वच्छता-अभियानांच्या नियमिततेचं बीज पेरण्याचा हा प्रयत्न!

या साऱ्या कार्यक्रमावर आधारलेली जुईची फिल्म म्हणजेच "Metamorphosis-My Story" ही छोट्यांना स्वच्छतेचा संदेश, स्वच्छतेचं महत्त्व सांगणारी फिल्म! १४ ते २० नोव्हेंबर या कालावधीत हैदराबाद येथे भरलेल्या 'दि गोल्डन एलिफन्ट' या आंतरराष्ट्रीय बाल-चित्र-महोत्सवात ५० देशांचा, २८६ फिल्म्सचा सहभाग होता. या उत्सवासाठी 'डिजीटल इंडिया' या



शीर्षकान्तर्गत चार विभाग करण्यात आले होते. त्यापैकी ज्या 'लिटल् डायरेक्टर्स' या विभागासाठी जुईने फिल्म पाठवली, त्या विभागासाठी ८० देशांमधून १२०४ प्रवेशिका आल्या होत्या. अर्थात् हा एक उच्चांकच होता! इतकी स्पर्धा असूनही जुईच्या फिल्मने या महोत्सवात स्थान पटकावले, हे खरोखरच कौतुकास्पद! बालमोहन विद्यामन्दिरात शिकणाऱ्या जुईने शाळेत झालेल्या 'फिल्म-मेकिंग वर्कशॉप' मध्ये 'श्रीमती नीलकान्ती पाटेकर' यांच्याकडून प्रशिक्षण व प्रेरणा घेतली, हे नमूद करावयास हवं!

शूटिंगचा दुसरा प्रकार - 'पिस्तुल-शूटिंग' ही तितक्याच कौशल्यानं जुईनं हाताळला आहे. महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवकसेवा संचालनालयातर्फे झालेल्या जिल्हा-स्तर शालेय महिला-क्रीडा स्पर्धांमधील पिस्तुल-शूटिंग विभागात तिने 'रौप्य पदक' मिळविलं. (सप्टेंबर २०१५) त्यानंतर विभागीय स्पर्धांमध्ये 'ब्रॉंझ पदक' मिळविलं. या यशामुळे नोव्हेंबर महिन्यात 'अमरावती' येथे झालेल्या राज्यस्तर शालेय-शूटिंगसाठी मुंबई शहर जिल्ह्याचं प्रतिनिधित्व करण्याची संधी तिला मिळाली.

मिडल स्कूल व हायस्कूल स्कॉलरशिप मिळविणाऱ्या जुईने आंतरशालेय वक्तृत्वस्पर्धांमधूनही पारितोषिकं प्राप्त केली आहेत. ॲथलेटिक्समध्ये १०० मीटर्स व ४०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत शाळेचं प्रतिनिधित्व केलं आहे. याशिवाय इंग्लिश कविता करणं, पेंटिंग करणं हे तिचे आवडीचे छन्द आहेत. गेली काही वर्षं ती कथ्थकनृत्य व हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचं शिक्षणही घेत आहे.

स्वत:बरोबर शाळेचंही नाव उज्ज्वल करणाऱ्या जुईच्या सर्वांगीण यशाचा आलेख असाच चढता राहो, ही हार्दिक शुभेच्छा!

**सौ. नीलिमा शशिकान्त नाडकर्णी, माहीम**
**(२४३०९५४४)**

### विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| सिद्धार्थ अशोक आरस-विक्रोळी | व | नेहा अरुण तेंडुलकर-डोंबिवली |
| गौरी संतोष नेत्रावळी-कुर्ला | व | सिवा पिल्लाई-अमेरिका |
| विघ्नेश विजय तेलंग-कारवार | व | अश्विनी दत्तात्रय पिकळे-कुमटा |
| अक्षय दिलीप वाघ-पुणे | व | गौरी शंकर नाडिग-हुबळी |
| निखील मिलींद वागळे-नेपीयन सी रोड | व | राधिका राजेश कामत-पारले |

## कृतघ्नता, कृतज्ञता आणि माणुसकी

१९५७ ते १९६५ साली आम्ही रिझर्व्ह बँकेच्या मालकीच्या मंत्रालयाच्या मागच्या बाजूला असलेल्या बँक हाऊस नामक आलिशान बिल्डींगमध्ये राहत होतो. बँक हाऊसला लागूनच एच.पी. चा पेट्रोलपंप आहे व या पंपाच्या मागे बरीच मोकळी जागा होती, जिथे आम्ही रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी क्रिकेट खेळत असू.

या पंपावर काम करणारा एक मामुली कर्मचारी तरसेमसिंग परहार नावाच्या सरदारजीशी आमची चांगली गट्टी जमली होती. तरसेमसिंगचे मुख्य काम हायड्रॉलिक जॅकवर गाडी चढवून तिची सर्व्हीसिंग तसेच पाण्याने धुलाई करणे होते. आम्ही मारलेले बॉल आणून देणे हेही काम तो मोठ्या आवडीने करत असे. तरसेमसिंग माझ्यापेक्षा ३ ते ४ वर्षांनी मोठा असावा.

तरसेमसिंगने १९५९ मध्ये पंपावरची नोकरी सोडून टॅक्सी ड्रायव्हरचे काम पत्करले. पण आमची दोस्ती कायम राहिली. खास करून पावसाळ्यात तो मला मोठ्या अगत्याने संध्याकाळी बॉम्बेजिमजवळ वॉडबी रोडवर असलेल्या माझ्या ऑफीसमधून घरी सोडत असे. ऐन त्याच्या धंद्याच्यावेळी आणि ते सुद्धा एक पैसा न घेता. कमीत कमी १५-२० वेळा तरी त्याने मला अशी सर्व्हीस दिली असावी. तुमचा कदाचित विश्वास बसणार नाही. मी सुद्धा कॉलेजमध्ये असताना सुट्टीच्या दिवशी ''टॅक्सी ड्रायव्हर लायसन्स'' शिवाय ३-४ वेळा तरी त्याची टॅक्सी घेऊन गेलेलो आहे व झालेली कमाई अर्धी अर्धी वाटून घ्यायचो. माझा भाऊ सतीश जो त्यावेळी नायर मेडिकल कॉलेजमध्ये एम.बी.बी.एस. करत होता तो सुद्धा अधूनमधून टॅक्सी घेऊन जायचा, केवळ गंमत म्हणून व थोडीफार कमाई म्हणून.

१९६५ ला माझ्या वडिलांची हैद्राबादला Director -Administrative Staff College या पदावर नेमणूक झाली व आम्ही मोठ्या संकटात सापडलो. माझ्या वडिलांचा रिटायर झाल्यावर कारवारलाच स्थायिक होण्याचा बेत होता व त्यामुळे त्यांनी मुंबईत घर घेण्याचा काही विचारच केला नव्हता. या ट्रान्सफरमुळे आम्हाला ६ महिन्यामध्ये बँक हाऊसमधील फ्लॅट सोडणे आवश्यक होते. आमची परिस्थिती अगदी केवीलवाणी झाली होती. मी माझ्या सासुरवाडीत, जयंत आणि उमेश देवीदास मामांकडे (जस्टीस डी. जी. पालेकर), सतीश नायर मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये आणि अजित कारवारला आजी-आजोबांकडे असे विभागले गेलो.

त्याच दरम्यान महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डातर्फे वरळीला आदर्श नगर हाऊसिंग सोसायटीची घोषणा झाली व ए,बी आणि सी प्रकारचे फ्लॅटस् महाराष्ट्र शासनातर्फे सोडतीच्या रुपाने विकण्याचे आदेश आले. पण सुरुवातीला रु. १६००० जमा करणे आवश्यक होते. बाबांनी फोनवर सांगितल्याप्रमाणे मी त्यांच्या ओळखीच्या दोन गृहस्थांकडे ३ महिन्यासाठी रु. १६००० कर्जरुपाने



ताबडतोब देण्यासाठी विनंती केली. कारण पैसे भरण्याची शेवटची तारीख फक्त ३ दिवसावर होती. या दोघांनी मला दोन दिवस फक्त झुलवत ठेवले व शेवटपर्यंत मला ते टाळतच होते. जीवनाचा एक धडा मी या प्रसंगावरून अनुभवला - ''उगवत्या सूर्यालाच सर्व नमस्कार करतात.'' जोपर्यंत बाबा कंट्रोलर-एक्सचेंज कंट्रोल डिपार्टमेंटमध्ये होते तोपर्यंत त्यांच्यासमोर लाळ घोटणारे, बाबांनी खुर्ची सोडताच त्यांनी पाठ फिरविली. रु. १६००० ची रक्कम कर्ज म्हणून सुद्धा देण्यास ते तयार नव्हते. हा तर त्यांच्या कृतघ्नतेचा कळसच होता. मी तर आशाच सोडली होती. त्याच दिवशी संध्याकाळी मला तरसेमसिंग भेटला. माझा चिंतीत चेहरा बघून त्याने कारण विचारले. सर्व हकीकत कळताच काही न बोलता स्वत:च्या घरी गेला व काही तासात रात्री मला परत येऊन भेटला. त्याच्या हातात एका मोठ्या पंच्यात बांधलेली एक पुरचुंडी होती. त्यात खूप चुरगळलेल्या नोटा होत्या. त्या मोजून पाहता जवळजवळ रु. १८००० निघाले., ही तर निश्चितच त्याच्या तीन-चार वर्षांच्या कष्टाच्या कमाईतील बचत असावी. त्याने अगदी जबरदस्तीने ते पैसे मला घ्यायला लावले. मी त्यातले रु. १६००० सरकार जमा केले. सोडती निघाल्या. माझा नंबर कुठेच आला नाही व मला १५ दिवसात माझे रु. १६००० परत मिळाले व मी ते पैसे तरसेमसिंगला ताबडतोब परत केले.

त्यानंतर जवळजवळ १५ वर्षांनी अचानक तरसेमसिंग माझ्या ऑफीसमध्ये आला. त्याची दोन मुले जसवंत सिंग, जगजीत सिंग आणि मुलगी मणींदर कौर मोठी झाली होती. मणींदरचा शैक्षणिक दाखला देऊन त्याने मला तिला काही मार्गदर्शन करण्यास विनंती केली. त्या मुलीचे सर्टिफिकेट पाहून मी अगदी हबकून गेलो. मणींदरला मुंबई युनिव्हर्सिटीमधून M.Sc. Nuclear Physics मध्ये First Class मिळाला होता. मी तिला TIFR मध्ये, मुंबई युनिव्हर्सिटीत तसेच PLanetarium Department मध्ये PHD करिता अर्ज करण्यास सांगितले. पण ती माझ्याकडे दोन महिने उशिरा आली होती. त्यामुळे तिला कुठेच ॲडमिशन मिळू शकली नाही. तिला मी माझ्या ऑफीसमध्ये कॉम्प्युटरवर सर्व American University साठी Surfing करण्यास सांगितले. खास करून स्कॉलरशिपकरिता. सुदैवाने तिला Miami University मध्ये ॲडमिशन मिळाली -With Scholarship equivalent to Rs. 27 Lakhs. पण या पोरीकडे Miami सोडा, इथे घालण्यायोग्य सुद्धा चांगले कपडे नव्हते. शिवाय एअर तिकीट, कमीत कमी ३ महिने निवास व भोजनासाठी येणारा सर्व खर्च मिळून जवळजवळ किमान २ लाख रुपयांची गरज होती. सर्वच तरसेमसिंगच्या व त्याच्या कटुंबीयांच्या आवाक्याबाहेरचे - कल्पनेबाहेरचे होते. अशावेळी त्या पंधरा वर्षापूर्वीच्या १६००० रुपयाचा अनुभव विचारात घेऊन मी मणींदरला आपल्या N.K.G.S.B. Co.op. Bank मध्ये घेऊन गेलो. श्री. पुटप्पा नाडकर्णी, चेअरमन असताना मी

सुद्धा बँकेचा दोन वर्षे डायरेक्टर होतो. त्यामुळे ओळखी होत्या. मी स्वत: गॅरंटर राहून तिच्याच नावाने २ लाख रुपयाचे कर्ज मंजूर करून घेतले व मणींदरच्या नवीन आयुष्यास सुरुवात झाली. स्कॉलरशिपचे पैसे मिळताच तिने बँकेचे कर्ज व्याजासकट पूर्णपणे देऊन टाकले. आज डॉ. मणींदर M.Sc.Ph.D. अमेरिकेतील एका मोठ्या कॉर्पोरेटमध्ये C.E.O. च्या खालोखाल काम करते व महिन्याला लाखो रुपये कमविते. जगजीत सिंग इलेक्ट्रीक मॅकेनिकचे काम करून थोडेफार पैसे मिळवित होता व धाकटा जसवंत सिंग दुबईला जायचा विचार करत होता. तरसेमसिंगला स्वत:ची नवीन टॅक्सी तसेच सी.एन.जी. मशीन पण घ्यायची होती. १६००० रुपयाची जाणीव ठेवून मी तिघांनाही N.K.G.S.B. Co.op Bank मधून माझ्या गॅरंटीवर कर्ज मिळवून दिले व त्यांनी अवघ्या एका वर्षाच्या आत ते व्याजासकट फेडले. आता सर्वांना खूप चांगले दिवस आले आहेत. मुलांनीही आपल्या आई-वडिलांची काळजी घेतली. जलंधर शहरामधील तरसेमसिंगचा शेती, घर मुलांनी पूर्णपणे अद्ययावत केले होते. आम्ही दोघे अतिआग्रहामुळे जलंधराला त्यांच्या घरी गेलो असताना असे कळले की आम्ही येणार हे समजल्याबरोबर, १५ दिवसापूर्वी जसवंत सिंग दुबईहून आला होता व जवळजवळ दोन लाख रुपये खर्च करून त्याने एक बेडरुम पूर्णपणे आकर्षकरीत्या सजविली व खोली लॉक करून चावी तरसेमसिंगकडे दिली व सांगितले की ही खोली आता फक्त कसबेकर अंकलच प्रथम उघडतील व वापरतील.

आम्ही खरोखरच हे सर्व ऐकून चकीत झालो. शिवाय त्या खोलीत लावलेला आमचा फोटो बघून आम्हाला गहिवरून आले. खरेतर एक पैसा सुद्धा मी त्यांना माझ्या खिशातून दिला नव्हता. फक्त थोडेफार मार्गदर्शन केले होते व बँकेतून कर्ज मिळवून दिले होते. सगळ्यांनी आपली उन्नती करून घेतली ती स्वत:च्या मेहनतीने, बुद्धीने व त्यांच्या नशिबाने. मी फक्त निमित्तमात्रच होतो.

तरीपण इतके प्रेम! इतका विश्वास! इतका आदर!!! इतकी आपुलकी!!!!
हा तर माझ्या आयुष्यातला एक विलक्षण, खूपच स्वस्ताला आणि फायद्याचा माणुसकीचा सौदा ठरला.

**अरुण भास्कर कसबेकर, चर्चगेट**
**९८२०२९१३६५**

कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की, सरदार तरसेमसिंग परहार यांना बुधवार दि. २७ जानेवारी २०१६ रोजी जलंधर येथे देवाज्ञा झाली. माझ्या या परमप्रिय मित्राला आम्हा सर्व कुटुंबीयांतर्फे ह्या लेखाचीच भावपूर्ण श्रद्धांजली.



## प्रतिक्रिया
## आग्रहापेक्षा प्रबोधन आवश्यक

मागच्या अंकात श्री. अरुण कसबेकर यांनी लिहिलेला '' एक अनुभव! पटला तर त्याचा फायदा घ्या!! नाहीतर....!'' हा लेख वाचला. त्यावरची माझी प्रतिक्रिया व्यक्त करीत आहे.

माणसे दारु, सिगारेट सारख्या व्यसनाच्या आहारी का जातात ह्याची अनेक कारणे असू शकतात. उदाहरणार्थ नोकरी-धंद्यामध्ये येणारे अपयश, ताणतणाव, नैराश्य, एकाकीपणा तसेच एखाद्याच्या वाट्याला येणारे मोठे दु:ख इत्यादी.

याशिवाय हल्लीच्या काळांत तुटत चाललेले कौटुंबिक सुसंवाद, सभोवतालचे वातावरण, पाश्चात्य जीवनशैलीचे अनुकरण, उच्चभ्रू समाजात वावरता येण्यासाठी या गोष्टी करणे आवश्यक आहेत असा समज तसेच मित्रमंडळी वा व्यावसायिक क्षेत्रातील मंडळींशी मिळतेजुळते घेण्यासाठी माणसे कळत-नकळत यात ओढली जातात. हे, मानसिक दुर्बलता व विवेकबुद्धीचा अभाव ह्यामुळे घडते. ह्यासाठी आत्मबल व मनोबल वाढवणे आवश्यक असते. योग्य शिकवण आणि उत्तम संस्कारातून हे घडू शकते.

मुलांच्या भवितव्यासाठी आवश्यक तेवढी शिस्त ही असावी. परंतु ती एवढी कडक वा जाचक असू नये जेणेंकरून घराचा तुरुंगवास वाटावा. तसेच अनिर्बंध स्वातंत्र्य दिल्यास स्वैराचाराला प्रोत्साहन मिळून मुले कुसंगतीला लागण्याचाही धोका असू शकतो. प्रत्येक मुलाची आकलन शक्ती, स्वभाव व वृत्ती वेगवेगळी असते. त्यामुळे मुलांना त्यांच्या पालकांनी त्यांचा कल पाहून योग्य तो बोध द्यावा हे उचित.

लहानपणी किंवा मोठेपणी आग्रहाखातर वा कुतूहल म्हणून दारु, सिगारेटचे प्रात्यक्षिक करून पाहिल्यास बहुतेकांना त्याची घृणाच येईल. असे असले तरी काहीजण वर नमूद केलेल्या विविध कारणास्तव व्यसनाधीन होऊ शकतात.

वयाच्या ५ ते १० वर्षादरम्यान मुले ही संवेदनाशील असतात. ह्या वयात मुलांच्या मनावर जे काही संस्कार केले जातात ते आत्मसात होतात व चिरकाल स्मरणात राहातात. ही गोष्ट मेंदूशी निगडीत संशोधकानीसुद्धा मान्य केली आहे.

मुलांच्या जडणघडणीच्या काळांत दारु, सिगारेट सारखी व्यसने कशी घातक व हानीकारक असतात हे योग्य प्रकारे उदाहरणासहीत समजावून सांगितल्यास जास्त परिणामकारक होईल. त्यांची सद्सद्विवेकबुद्धी जागृत राहून मुलांचा स्वत:च्या मनावर ताबा राहील आणि पुढील आयुष्यात अशा व्यसनापासून ती दूर राहतील असे वाटते.

**सौ. संगीता शिरीष वाघ, बोरीवली**
**२८३३०८७० / ९८९२६८६१०३**

गेल्या अंकातील श्री. कसबेकर ह्यांचा लेख वाचला.

मला काही मुद्दे मांडायचे आहेत : १) लहान निरागस मुलांना मोठ्यांनी प्रलोभन आग्रहाने ऑफर करणं खूपच धोकादायक आहे! कारण व्यसनं बऱ्याच वेळेला अनुवंशीक असतात। २) प्रगत देशात लहान मुलांना टोबाको / दारु देणं हे बेकायदेशीर आहे। भारतात ही इल्लेगल आहे. ३) अठरा वर्षाखालील मुला-मुलींना लैंगिकते बद्दल पण कुतूहल असतं. म्हणून त्यांना संभोग करण्यासाठी आग्रह करायचा का?

**हेमांगी कुलकर्णी नाईक, नवी मुंबई**

## एक अविस्मरणीय घटना

१७ जानेवारी रोजी संघाची पिकनीक 'कृष्णा रिसॉर्ट' येथे गेली होती. ठाणे, माहीम व जोगेश्वरी अशा तीन बसेसमधून सर्वजण तिथे पोचलो. चहा-खाणे झाल्यावर काहीजणी तेथून जवळच असलेल्या श्री चामुंडा देवीच्या देवळात जाऊन आल्या. त्यांच्याकडून देवळाचे व मूर्तीचे वर्णन ऐकून आम्हा काही बायकांना तेथे जाण्याची तीव्र इच्छा झाली. व आम्ही ८ जणींनी रिक्षाने जाण्याचे ठरवले. रिक्षासाठी रिसॉर्टच्या बाहेर हाय-वेला आलो. पण रिक्षा मिळेना. इतक्यात आम्हाला एक टेम्पो दिसला. आमच्यापैकी एकीने धावत जाऊन त्याला थांबवले. तो त्याच दिशेला जात असल्याने आम्हाला देवळात पोचवण्याची विनंती केली. तो तयार झाला. टेम्पो साधारणच होता. पण मागच्या बाजूचे सामान बाजूला करून व दोन्ही बाजूचे बाक पुसून त्याने आम्हाला जाग करून दिली. ड्रायव्हर व दुसरा एक माणूस होता. त्यांना देवळाचे ठिकाण कुठे आहे ते माहिती नव्हते. पण थोड्या थोड्या वेळाने गाडी थांबवून तो ड्रायव्हर व शेजारचा माणूस लोकांना विचारत होता. शेवटी एका ठिकाणी हायवेवर गाडी थांबून बाजूच्या आडव्या रस्त्याने पुढे जायला सांगितले. आम्ही सर्वांनी मिळून रु.१०० ड्रायव्हरला देऊ केले पण तो नोट हातातच घेईना. मग दुसऱ्या माणसाकडे देऊ केले. पण त्यानेही नकार दिला व देवीच्या दर्शनाला जाता तर मी पैसे घेतले तर पाप लागेल. फक्त देवीला आमचा नमस्कार सांगा असे म्हणाला. हल्लीच्या स्वार्थी जगात अती सामान्य माणूस पैसे नाकारताना पाहून आम्ही अवाक झालो. अशा माणसांमुळेच माणुसकी टिकलीय. नंतर ती नोट देवळाच्या पेटीत घालून आम्ही सर्वांनी त्यांच्यासाठी देवीचा आशीर्वाद मागितला. पुढेही देवळापर्यंत एका भल्या माणसाने आम्हाला त्याच्या कारमधून पोचवले. जणू काही देवीनेच या माणसांना आमच्याकडे पाठवले अशी आम्हा सर्वांची भावना झाली. परतून येईपर्यंत त्या टेम्पोवाल्याचा विषय आमच्या डोक्यात घोळत होता.

**सौ. सुहासिनी अ. वर्टी, जोगेश्वरी**
**९६१९२७६७८३**



## मुंबई मंचतर्फे कारवारी आनंदमेळावा

कोणताही खाद्यपदार्थ हा एखाद्या प्रदेशाची संस्कृती आणि परंपरा यांचं प्रतिनिधित्व करत असतो. या खाद्यपदार्थांच्या पाककृतीमध्ये विविध पद्धती समाविष्ट असतात आणि त्यातूनच त्या खाद्यपदार्थांबाबतचा वेगळेपणा ठरतो. आपले कारवारी पदार्थ त्याला अपवाद कसे असतील. अशाच काही पदार्थांचा रसास्वाद आपल्या ज्ञातिबांधवांनी मुंबई मंचातर्फे दिनांक ३१ जानेवारी २०१६ रोजी जोगेश्वरी येथील के. जी.एस. हाऊसिंग सोसायटीच्या पटांगणात आयोजित केलेल्या कारवारी आनंद मेळाव्याच्या निमित्ताने घेतला.

वॉटस्-अप, फेसबुक तसेच वर्तमानपत्रे आदि माध्यमांतून झालेल्या जाहिरातीमुळे यंदा आबालवृद्धांची विक्रमी गर्दी लोटली होती. स्टॉलधारकांचा सहभागही या वर्षी अधिक होता. झगमगती विद्युत रोषणाई, कल्पकरीत्या सजवलेले स्टॉल्स, खाद्यपदार्थांचा खमंग सुवास यांनी भारावलेल्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर सुकरुंडे, अळूवडी, आप्पे, उकडीचे मोदक अशा शाकाहारी पदार्थांसह तिसऱ्याचे वडे, मोरीचे धबधबे, कोंबडी-वडे, कोलंबी मसाला, सुरमई फ्राय, बांगड्याची उडीदमेथी इत्यादी मांसाहारी पदार्थांची आकर्षक मांडणी पाहून खवय्यांच्या तोंडाला पाणी न सुटले तरच नवल. बर्गर, नूडल्स, दहीवडे, पाणीपुरी हेही साथीला होतेच. तिवळ, सोलकढी व कोकम सरबत या कोकमी त्रिकूटामुळे खाण्याची लज्जत अजून वाढली. घरगुती उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने या मेळाव्यात पापड, लोणची, सांडगे यासोबत तयार कपडे, चादरी, पर्सेस, साड्या, इमिटेशन ज्वेलरी व गिफ्ट आर्टिकल्सचे स्टॉल्सही होते. अनेकांनी खाण्याचा आस्वाद घेता घेता या वस्तूंची पाहणी करून या उद्योजकांचेही कौतुक केले.

आर्थिक प्रायोजकत्वासाठी आपली एन. के. जी. एस. बी. बँक नेहमीप्रमाणे यंदाही पाठीशी उभी होती. बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी यांनीही आवर्जून उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. के. जी. एस. को. ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्यांनी सोसायटीचे पटांगण या कार्यक्रमासाठी उपलब्ध करून विशेष साहाय्य केले. या सर्वांचेच मुंबई मंचातर्फे आभार तसेच सर्व हजर असलेल्या खाद्यप्रेमींना व स्टॉलधारकांना हा वार्षिक कारवारी सोहळा यशस्वी केल्याबद्दल धन्यवाद.

**डॉ. विवेक कुलकर्णी,**
**दादर**

| स्टॉलधारक | खाद्यपदार्थ / इतर जिन्नस |
|---|---|
| प्रकाश गुडे | मोरी धबधबे व गृहोपयोगी खाद्य उत्पादने |
| मीनाक्षी मुजुमदार | purses and bags |
| विनया नाडकर्णी | ladies gowns |
| सारिका सुंठणकर | imitation jewellery |
| आशिश शिरोळकर | कुंदा व बेळगावी साड्या |
| लता पै | लोणची, पापड, सांडगे वगैरे |
| नीलेश नाईक | बांगड्याची उडीदमेथी, कोलंबी लोणचे, भेळ, नूडल्स |
| सदाशिव वागळे / स्वप्ना वागळे | burger, shevai with coconut milk, chicken, कलेजी, तंदुरी चिकन, आंबा डाळ, पन्हे, काजू, चकली |
| चित्रा धुमे | gift articles |
| जयश्री कसबेकर | चिकन बॉल करी, चिकन खिमा पॅटीज, करंदी भरली वांगी |
| मुग्धा राजाध्यक्ष | चिकन रोल्स व पाणीपुरी |
| विद्या कसबेकर | मेथी भजी, उकडीचे मोदक, चहा |
| वीणा पालेकर | गाजर हलवा, अळूवडी, कोथिंबीर वडी |
| पराग जोशी | विविध प्रकारचे मसाले |
| देवीदास शेणॉय | कोंबडी-वडे, शेव, चिवडा इत्यादी |
| ठाणे मंच | कोलंबी मसाला, भरली वांगी, तांदळाची भाकरी, तिवळ, मिक्स व्हेजिटेबल लोणचे |
| सुमंगला वैजप्पन | तिसऱ्याचे वडे, कोलंबीचे खोळ, पुरणपोळी, आप्पे, सांबार व कषाय पावडर |
| वैशाली दळवी | कोलंबी मसाला, कोलंबी पुलाव, सुरमई फ्राय, हळदी पानातले बांगडे, सोलकढी |
| निधी चव्हाण | ladies dresses and purses |
| राजशेखर चव्हाण | चिकन बिर्याणी |
| शैला पै | purses and tupperware products |
| वृषाली बोकील | चिकन खिमा, कोकोनट पुडींग |
| महेंद्र कसबेकर | श्रीखंड, पनीर, लस्सी, हळद, चिकू |
| वनिता कामत | पाणीपुरी, शेवया, सांडगे इत्यादी |
| किशोर बोरकर | मसाला पोहे, दूध-पाक, कोकम सरबत |
| मिथिला गायतोंडे | hand painted purses, bags and dress material |
| तन्वी नाडकर्णी | gift articles |
| उल्हास वांतेकर | चीज पॅटीज, दहीवडे, सुकरुंडे |
| दर्शन मेत्राणी | sarees and jewellery |
| राघवी सडेकर | ladies gowns and hand painted kurtis |
| मुंबई मंच | popcorn and suger-candy |



## ठाणे मंचाची एक दिवशीय सहल

'नेमेचि येतो मग पावसाळा' या उक्तीप्रमाणे दरवर्षी ठाणे मंचची सहल ही प्रत्येक जानेवारीत येतेच पण दरवर्षी पावसाळ्याचे रूप बदलत असते त्याप्रमाणेच ठाणे मंचची सहल दरवर्षी असली तरी प्रत्येक सहलीचे स्वरूप वेगळे! असे असले तरी मज्जा मात्र तीच!

आपल्या वार्षिक स्नेहसंमेलनापासूनच लोकांची विचारणा सुरु होते, 'पिकनिक केन्ना आसा? खंय आसा?' म्हणुन! ठाणे मंचचे सभासद ही लोकांची आवड लक्षात घेऊन त्यांची कुठलीही गैरसोय होऊ नये म्हणून काळजी घेत असतात.

१७ जानेवारी २०१६ रोजी कृष्णा रिसॉर्ट (वसई) येथे सहल आयोजित केली होती. मुंबईहून दोन व ठाणे-मुलुंड वरून एक अशा तीनही बसेस एकाच वेळी रिसॉर्टवर पोचल्या. भरपेट नास्त्यानंतर काही जणांनी जैन मंदिर व देवीच्या देवळाला भेट दिली. काही जणांनी रिसॉर्टसच्या तलावात पोहण्याचा आनंद लुटला.

या रिसॉर्टमध्ये एक छान मोठे मैदान होते तिथे बऱ्याच हौशी कलाकारांनी आपल्या कला (गाणे, नृत्य, विनोद सांगणे, अनुभव सांगणे, बासरी वाजवणे इ.) सादर केल्या. सतीश वागळे, लता पिकळे, तारा गायतोंडे, संध्या पै, मेधा सोहोनी, मंजिरी वेदविख्यात, आरती गायतोंडे, वसुधा कामत, आशा वाघ, प्रज्ञा वागळे, प्रदीप देसाई, अपर्णा नाडकर्णी, विनया नाडकर्णी, पद्माकर तेलंग, संजीव पै, वृंदा दिवेकर, दीपा मुझुमदार, हेमा कुलकर्णी, विलासिनी बोरकर, जान्हवी राजाध्यक्ष इत्यादी सर्वांनी मनापासून भाग घेऊन सर्वांचे मनोरंजन केले. या उत्स्फूर्त कार्यक्रमाचे निवेदन श्री. सुरेश पालेकर यांनी केले.

त्यानंतर चमचमीत जेवणानंतर सामुहिक खेळांचे आयोजन रसिका, शैलेश, प्रसाद या गायतोंडेनी केले. त्यातही छोट्या मुलांपासून ज्येष्ठापर्यंतचा उत्साह वाखाणण्यासारखा होता. महिलांच्या संगीत खुर्चीत मीनल वेदविख्यात तर पुरुषांच्या संगीत खुर्चीत किरण वैष्णव यांनी पहिला नंबर पटकावला तर महिलांच्या पॉटेटो रेसमध्ये अपर्णा नाडकर्णी पहिली आली तर ग्रुप मेकिंगमध्ये १० जणांना बक्षिस मिळाले.

नेहमी सहलीला येणाऱ्या वाशीच्या मंजिरी वेदविख्यात यांच्या देखण्या मुलीने तिने काम केलेल्या जाहिरातीचे (ओडोनील-साऊथ बॉम्बेच्या मैत्रीणीचा) लोकाग्रहास्तव प्रात्यक्षिक करून दाखवले व वाहवा मिळविली.

या वर्षी आम्ही चित्रा कामत बरोबरच राजू बोरकरलाही खूप मिस केले. सुरुवातीच्या सहलीपासून आतापर्यंतच्या मुंबईच्या बसेसची एकहाती धुरा वहाणाऱ्या राजूची अनुपस्थिती सर्वांनाच जाणवली. ठाणे मंचची सहल मुंबई मंचच्या सहकार्याशिवाय पूर्ण होत नाहीच. त्यासाठी मुंबई मंचच्या सर्व सभासदांचे मन:पूर्वक आभार!

**मंजिरी मनोज कुलकर्णी**, ठाणे

## सस्नेह मेळावा व तिळगुळ समारंभ

सहयोग मंदिर ठाणे येथे २४ जानेवारी १६ रोजी ठाणे मंचचा सस्नेह मेळावा व तिळगुळ समारंभ संपन्न झाला. स्नेहपूर्ण वातावरण व तिळगुळाचा गोडवा यांचा मिलाफ, असे ह्या कार्यक्रमाचे वर्णन करता येईल.

गेली २० वर्षे अेन. के. जी. एस. बी. संघ ठाणे मंचने सुरु केलेले वधू-वर सूचक मंडळ ठाणे, मुलुंड, माहीम, जोगेश्वरी, बोरिवली व हल्ली पुणे येथे अविरत चालू आहे. अतिशय निर्लेपपणे व सामाजिक बांधिलकीने आपल्या भगिनी हे मंडळ चालवीत आहेत. आताच्या संगणकीय युगात मंडळाने प्रवेश केला असला तरी या भगिनीचा आपलेपणा त्यात नसणार हे खरं आहे ना? तर या भगिनींचा फुल ना फुलाची पाकळी देऊन सत्कार करण्यासाठी हा सस्नेह मेळावा ठाणे मंचने आयोजित केला होता. ठाणे मंचला नेहमीच सहकार करणाऱ्या सौ. नीलिमा नाडकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून आनंदाने तयार झाल्या. श्री. सुरेश पालेकर यांच्या आग्रहाने ज्येष्ठ भगिनी सौ. सुमन देसाई याही प्रमुख पाहुण्या म्हणून आल्या होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दोन्ही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली.

'सूर निरागस हो' या गणेश स्तुतीच्या गाण्याने मिथिला गायतोंडे व तिच्या सहकाऱ्यांच्या सुंदर नृत्याने सुरुवात झाली. स्मिता वाघ, उमा वागळे, प्राची दळवी, अपर्णा नाडकर्णी व प्रियांका दळवी यांनी तिला साथ दिली. त्यांचे फेटेही छान उठून दिसले.

तिळगुळ समारंभही असल्याने सर्व भगिनीना तिळगुळ व वाण देण्यात आले व (पुरुषांनाही तिळगुळ वाटण्यात आला) मान्यवर पाहुण्यांना ठाणे मंचच्या सौ. चित्रा कामत यांच्या हस्ते हळदी-कुंकू व वाण देण्यात आले.

नंतर उपस्थितांना ठाणे मंचबद्दल थोडक्यात माहिती व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देण्यात आली.

ठाणे मंच चालवत असलेल्या वधू-वर मंडळाचे काम पाहिलेल्या ठाण्याच्या कै. अरूंधती कंटक, शांता वागळे, शुभदा (मीना) कुलकर्णी, तेजश्री देसाई व सिंधू कुलकर्णी, मुलुंडच्या वृंदा दिवेकर, लता पिकळे व सुषमा मुळगावकर, माहीमच्या कै. शांता बोरकर, अनसूया कबसेकर, उमा वैष्णव, अनन्या नाडकर्णी, माधवी सबनीस, जोगेश्वरीच्या तारा गायतोंडे, अनुजा नाडकर्णी, बोरीवलीच्या रोहिणी वागळे व पुण्याच्या दीपा सराफ या सर्व भगिनींचा प्रमुख पाहुण्या नीलिमा नाडकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. (काही भगिनी काही वैयक्तिक



कारणांमुळे हजर राहू शकल्या नाहीत.) वृंदा दिवेकर, तारा गायतोंडे, सिंधु कुलकर्णी, लता पिकळे, सुषमा मुळगावकर या सर्व भगिनीनी आपले बरे-वाईट अनुभव सकारात्मक पद्धतीने सांगितले. लोकांनीही सर्वांच्या कोंकणीतल्या मनोगताला छान दाद दिली.

दसऱ्याच्या मुहूर्तावर २२.१०.१५ रोजी गोव्याला वेबसाईट उघडण्यात आल्याचे आपणा सर्वांना माहीत आहेच. ठाण्याचे इंजिनीयर श्री. विजय कामत यांनी ही वेबसाइट सुरु करण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन तसेच आपला अमूल्य वेळ देऊन ठाणे मंचला अनमोल मदत केल्याबद्दल त्यांचाही सौ. सुमन देसाई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनीही कोंकणीतून आपले मनोगत व्यक्त केले. वेबसाइटचे काम बघणाऱ्या स्मिता मनोहर यांचाही सत्कार करण्यात आला. सुरुवातीपासूनच ठाणे मंचला मदत करण्यास तयार असलेल्या (आमगल्या राजूलो) राजू बोरकरचा सत्कार सौ. सुमनताई यांच्या हस्ते करण्यात आला. ठाण्यातले कार्यक्रम असो नाहीतर सहली. राजू नेहमीच पुढे! राजूनेही थोडक्या शब्दात आपले मनोगत व्यक्त केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात सौ. नीलिमाताईंनी संघाला वटवृक्षाची उपमा दिली व ठाणे मंच, मुंबई मंच त्यांच्या पारंब्या असल्याचे सांगितले व या फांद्या नाशिक, पुणे येथेही पसरव्यात अशी इच्छा व्यक्त केली तसेच ठाणे मंचचे वधू-वर मंडळ चालवणाऱ्या भगिनी तसेच राजू बोरकर या सर्वांचे भरभरून कौतुक केले व लोकांनीही त्यांच्या भाषणाला उत्स्फूर्तपणे दाद दिली. सौ. सुमनताई यांनीही आपले भाषण वाचून दाखविले. किरण दिवेकर यांनी सर्वांचे आभार मानले.

मध्यंतराल्या स्वादिष्ट नास्ता-चहानंतर दादरच्या प्रणव हरदास यांच्या स्वरसाधनांतील मुलांनी प्रेक्षकांना आवडतील अशा गाण्यांची निवड करून छानपणे सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. सौ. हेमा कुलकर्णी यांनी त्यांना बक्षिसे देऊन कौतुक केले. कार्यक्रम खूप छान झाल्याची प्रेक्षकांकडून प्रतिक्रिया आली.

**मंजिरी मनोज कुलकर्णी**, ठाणे

**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**
**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**
Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**
**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.), Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## Faith, Grace, Strength-Amanda Macy Hichkad
## (March 9, 1973-September23,2014)

Amanda Macy Hichkad, my loving wife and mother of our three children, Grayson (13), Cooper (11) and Brody (7), died on September 23,2014, from cervical cancer at the age of 41. She was daughter-in-law of my parents Ramesh and Usha Hichkad.

In December 2008, Amanda was diagnosed with early stage cervical cancer. Because the cancer was relatively isolated, she was treated with surgery, low dose chemotherpy and radiation. By April 2009, Amanda was considered cancer-free and in remission. However, three and a half years later, in August 2012, Amanda's cancer recurred and returned. Amanda's approach to cancer was truly inspirational. Although the chemo therapy caused her to lose her hair and feel nauseous, she never felt sorry for herself or had a negative attitude. She would eventually lose her ability to walk and even care for herself, but most importantly and above all, she valued each and every day of life as a gift to be cherished and lived to the fullest. She brought joy into the lives of everyone she interacted with and was a tremendous wife, mother, daughter and friend.

During her bouts with cancer, our family utilized the services of an organization called Cancer Life Net. Cancer Life Net is a program offered through our local hospital and cancer center that offers free-of-charge supportive care services to all cancer patients and their families who live in our community. These services are funded through donations and gifts made to the hospital on an annual basis. Amanda was an ardent ambassador for Cancer Life Net and its mission. Even in her state of illness, she raised money for Cancer Life Net services by running half marathon (21 kilometer) races.

Based on Amanda's advocacy for the Cancer Life Net program as well as personal connection to the resources and benefits, our local hospital organized a fundraising walk that took place on May 17, 2014 called the "Amanda Hichkad CCA Celebration Walk." Amanda's personal philosophy pillars of "Faith, Grace, Strength" were used as a slogan for the walk logo. The initial goal of the walk was to raise $15,000. Amazingly the inaugural walk raised over $100,000 and was attended by over 1500 participants. The success of the first walk was overwhelming and Amanda was able to witness it all that day. It was decided that the walk would become an annual event and each year strive to grow the awareness and support of Cancer Life Net in order to sustain its services.




After a brave and valiant battle, she passed away on September 23, 2014. Upon her death, I said that Amanda did not "lose her battle with cancer" as it is so often said of people who succumb to the disease. She beat cancer. She beat cancer because she took something so terrible, evil and destructive and through her faith, grace and strength, turned it iinto an inspirational example of how to live, love, laugh and give hope to her family, friends and community. My life, and the lives of many others who knew her or knew of her, is forever changed for the good. She made the world a better place and left a legacy that will endure and help carry us forever.

The third annual Amanda Hichkad CCA Celebration Walk is scheduled for April 30, 2016 with a goal of over 2000 participants and fund raising goal of 150,000. Amanda would be so very proud to see how the walk has evolved that her name is forever associated with such a positive community event that raise so much money to help cancer patients and their families in our local community.

Thank you for your faith, grace and strength Amanda. We love you and honor your life each day by living ours to the fullest and continuing to find ways to help those in need.

**Tejan Ramesh Hichkad,** USA



## श्रीमती इंदिरा कामत – आईचा अमोल ठेवा

माझ्या सासूबाई – श्रीमती इंदिरा कामत (पूर्वाश्रमीच्या विठाबाई कसबेकर) यांचे ११ ऑक्टोबर २०१५ रोजी वयाच्या ९०व्या वर्षी निधन झाले. माझ्या मते ती माझ्या व इतरांसाठी बराच मोठा ठेवा मागे ठेवून गेलेली आहे. मला तो ठेवा तुमच्या समोर मांडायचा आहे. माझ्या सासुबाईंनी जीवन कसे जगावे ह्यावर भाषणे दिली नाहीत की, सल्लेही दिले नाहीत पण, ती शेवटच्या ५ वर्षांत ज्या प्रकारे जगली, हेच तिचे जीवन कसे जगावे, ह्यावर भाष्य होते.

हे काही रॉकेट विज्ञान नाही, किंवा समजायला फार कठीण आहे असेही नाही. किंबहुना सहज उमजावे इतके साधे असेच आहे. पण साधे आहे म्हणून आचरणात आणायला ते तितके सोपे नाही. शेवटच्या ५ वर्षात माझी सासू प्राप्त परिस्थितीचा स्वीकार करून जीवन जगली.

अंथरुणाला ५ वर्षे खिळण्याची कल्पना करा. घराबाहेर पडायचे नाही, इतकेच काय, एका खोलीतून दुसऱ्या खोलीतही क्वचित जायचे. तिची श्रवणक्षमता मंदावत होती. दृष्टी अंधुक झाली होती, हालचाली मंदावत होत्या पण, तरीही ती जगण्यापासून माघारी फिरली नाही. आयुष्याने तिची काय अवस्था केली होती ह्याबद्दल कोणालाही दूषण वा अपशब्द न देता ती जगली. आपल्यातल्या बहुतेकांची परिस्थिती तिच्यापेक्षा कितीतरी पटीने बरी असतानासुद्धा, तसे वागणे जमत नाही. आपल्याला वेगळे आयुष्य हवे असते, सद्य परिस्थिती स्वीकारायची आपली तयारी नसते.

एक लक्षात घ्या की, ती हतबल नव्हती – ती खऱ्या अर्थाने जीवन जगत होती. रोज वर्तमानपत्र वाचायची (भिंग घेऊन) आणि जगातल्या घडामोडींचा मागोवा ठेवायची. आपल्या नातेवाईकांच्या ख्यालीखुशाली बाबत तिला अद्ययावत माहिती असे. शरीर जरी साथ देत नव्हते तरी सगळ्या चर्चेत भाग घ्यायची. जीवनाचा आनंद लुटायची –९० व्या वाढदिवसाला चायनीज जेवण मागण्यापर्यंत, व जुन्या काळातील लोकप्रिय गाणी गाण्यापर्यंत. आपल्या नातवंडांशी तेवढ्याच उत्साहाने थट्टा मस्करी व गप्पागोष्टी करणे तिला जमत असे.

तिच्या मुलाने व सुनेने तिची जी काळजी घेतली त्याबद्दल त्यांना ह्या सगळ्याचे श्रेय जाते. सगळ्यात कौतुकाची गोष्ट म्हणजे ही सेवा करताना त्यांनी नर्स किंवा बाईची मदत घेतली नाही. तिला नेहमी स्वच्छ व नीटनेटके ठेवत–बाहेरून आलेल्या व्यक्तीला आपण रुग्णाच्या खोलीत आहोत याची जरासुद्धा जाणीव होत नसे. मला वाटते की मुलगा, सून व नातू ह्यांची स्वार्थहीन सेवाच तिला समाधानी ठेवण्यात कारणीभूत होती.

माझ्या सासूबाईंनी मागे पैशाचे ढभोलं ठेवले नसेल पण, ती एक वैचारिक गाठोडे नक्कीच ठेवून गेली. तिची प्राप्त परिस्थिती स्वीकारण्याची व त्याला सामोरे जाण्याची कला आमची पिढी अनुकरण करू शकेल अशी मला आशा वाटते. ती जिथे कुठे आज असेल तिथून या बाबतीत अनुकरण करणाऱ्या सर्वांवर तिची कृपादृष्टी असेल ह्याची मला खात्री आहे.

(प्रायोजित) — राजू वर्दे, ठाणे




www.kccgoa.in




अप्रतिम निसर्गाने नटलेलं सुखसमृद्धी

मंगेशाच्या देवळापासून २ मिनिटांच्या अंतरावर,
मंगेशी, फोंडा- गोवा

प्रोजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मन:शांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

फ्लॅटस् उपलब्ध: १ रुम किचन, १ बी.एच्.के, २ बी.एच्.के

a Project by:
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी

मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि: 2683 3841/47/72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिस: टी- १, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321 | गोवा साईट: 95/1, धेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

saadadvertising.com

## निधन

| | | |
|---|---|---|
| **पांडुरंग गणपत बर्डे** | (उळवी) | अमेरिका |
| **उमेश गजानन बोरकर** | (कारवार) | बंगळूर |
| **गणपत (सदानंद) भवानीशंकर देसाई** | (कडवाड) | डोंबिवली |
| **दिलीप वासुदेव (मोहन) देसाई** | (कडवाड) | कुर्ला |
| **आशा (कुसुम) भालचंद्र गायतोंडे** | (अंकोला / काणकोण) | शिवाजी पार्क |
| **स्वाती किसन कंटक** (पूर्वाश्रमीच्या सुधा भालचंद्र (आनंदभट) नेत्रावळी | (अंकोला) | पारले |
| **हीरा (कुमुद) माधव कसबेकर** | (कडवाड) | माहीम |
| **जनार्दन विठ्ठल कुलकर्णी** | (अवर्सा) | ग्रांट रोड |
| **प्रकाश दिनकर कुलकर्णी** | (हळगे) | ऑपेरा हाऊस |
| **शीला (कुसुम) आत्मानंद कुलकर्णी** | (किन्नर) | हाजी अली |
| **रजनी माधव कुलकर्णी** | (अवर्सा) | अवर्सा |
| **उमा गोविंद मुझुमदार** | (अंकोला) | दहिसर |
| **अरुण गोविंद पिंगे** | (सदाशिवगड) | बोरीवली |
| **सुब्राय बाळा पिकळे** | (अंकोला) | कुमटा |
| **मोहनदास मारुती पिकळे** | (अंकोला) | मुलुंड |
| **गंगा गणपती स्थळेकर** | (अंकोला) | भांडुप |
| **गुरुनाथ गणपती स्थळेकर** | (अंकोला) | मुलुंड |
| **मनीषा अभिजीत बासू** (पूर्वाश्रमीच्या मनीषा मंगेश नाडकर्णी) | (अंकोला) | अमेरिका |
| **सुनील शरद वागळे** | (अस्नोटी) | बोरीवली |
| **प्रकाश शांताराम वर्टी** | (सदाशिवगड) | कल्याण |


**YOGESH D. WAGLE**
**YOUR ONE STOP SHOP FOR**

• HEALTH INSURANCE • GENERAL INSURANCE • LIFE INSURANCE
• PERSONAL LOAN • CAR LOAN • HOUSING LOAN
• BUSINESS LOAN • MORTGAGE LOAN

17/2, Virupaksha Kripa, 1st Floor, P. B. Road, Hubli - 580029
Mob. 9844127170 Email : yogeshwagle195@rediffmail.com




## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या
## (मागील अंकानंतर)
## उल्लेखनीय देणग्या

**सौ. उषा व रमेश हिचकड यांजकडून संघाला दोन लाख रुपयांची देणगी**

मेरीलँड, अमेरिका येथे वास्तव्याला असलेले श्री. रमेश नारायण हिचकड व त्यांच्या पत्नी सौ. उषा या उभयतांना कारवार व कारवारकर यांच्याविषयी विशेष जिव्हाळा आहे. त्यांचे वडील नारायण विठ्ठलराव हिचकड यांनी उत्तर कानडा जिल्ह्यातील अनेक गावांत शानभोग म्हणून काम केले होते. निवृत्तीनंतर अंकोला येथे स्थायिक झाल्यावर त्या परिसरातील अनेक गरजूंना त्यांच्या कागदपत्रांना कायदेशीर स्वरूप देण्यासाठी ते साहाय्य करीत असत. रमेश यांच्या मातोश्री हीराबाई या माहेरच्या बाडच्या वागळे घराण्यांतील, कारवार येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. गजाननराव वागळे यांच्या भगिनी. रमेश व उषा यांनी अलीकडेच आई-वडिलांच्या स्मरणार्थ वृद्धसेवा निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

ऊर्वरित एक लाख रुपयांची देणगी त्यांनी स्नुषा अमण्डा तेजन हिचकड हिच्या स्मृतीप्रित्यर्थ संघाच्या वैद्यकीय सेवानिधीसाठी दिलेली आहे. अमण्डा हिचे २०१४ साली अवघ्या ४१ व्या वर्षी कर्करोगाने निधन झाले. अशा प्राणघातक व्याधीने कुठलीही व्यक्ती तर नव्हेच पण आप्तेष्टही खचून जातील. तरी अशा जीवघेण्या स्थितीतसुद्धा तिने न डगमगता हसतमुख, प्रसन्न व लोभस स्वभावाने नातेवाईक व स्नेहमंडळीमध्ये सतत उत्साहाचे वातावरण कायम ठेवले. बिकट परिस्थितीतसुद्धा आयुष्याला कसे धीराने सामोरे जायचे हा इतरांसाठी तिने एक स्फुर्तीदायक व आदर्श वस्तुपाठ घालून दिला. तिच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी एक 'वॉक' काढण्यात येतो. त्यातून मिळणाऱ्या निधीचा विनियोग इतर कर्करोग्याच्या व कुटुंबीयांच्या उपचारासाठी व समुपदेशनसाठी (counseling) करण्यात येतो.

अमण्डाच्या कर्तृत्वाविषयी तिचे यजमान तेजन यांनी लिहिलेला एक लेख याच अंकात प्रसिद्ध केला आहे.

**श्री. शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी**

सदाशिवगड शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करून चांगले नांव कमविलेले श्री. शरद सलगर यांचे २०१२ साली दु:खद निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतीच्या स्मरणार्थ संघाच्या समाजसेवा निधीसाठी, वृद्धसेवानिधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी ५१ हजार याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी देतात. यंदाही त्यांनी अशाच प्रकारची देणगी दिलेली आहे.

**शतकवीर श्रीमती इंदु मुझुमदार यांच्यातर्फे एक लाख रुपयांची देणगी**

नायगांव, दादर येथे राहणाऱ्या श्रीमती इंदु मधुकर मुझुमदार या संघाच्या एक हितचिंतक. अलीकडेच १९ फेब्रुवारी रोजी त्यांना शंभर वर्षे पूर्ण झाली. याबद्दल त्यांचे अभिनंदन. त्यादिवशी

त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना शाल व श्रीफळ देऊन शुभेच्छा देण्याचा व त्यांच्याकडून आशीर्वाद घेण्याचा संघाच्या व एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचा मानस होता. पण त्याचवेळी काही दुखापतीमुळे त्यांना सुश्रुषालयात ठेवण्यात आले होते. त्यामुळे नाईलाजाने त्यांचा यथोचित सन्मान वाढदिवसाच्या दिवशी करणे शक्य झाले नाही. त्यांची प्रकृती लवकरांत लवकर तंदुरुस्त होण्यासाठी कुलदेवतांकडे प्रार्थना.

इंदुकाकींच्या जन्मशताब्दीप्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांनी वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

**पांडुरंग (नरहरी) वाघ यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी एज्युकेशन सोसायटीला आणखी एक लाख रुपयांची देणगी**

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात श्री. पांडुरंग ऊर्फ नरहरी विनायक वाघ यांच्या २९ ऑगस्ट २०१५ या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या कन्या सौ. नीला दिलीप मुझुमदार व कुटुंबीय यांनी एज्युकेशन सोसायटीला दिलेल्या एक लाख रुपये देणगीचा उल्लेख आला होता. दिवंगत वाघ यांचे सुपुत्र व इ. एन्. टी. तज्ज्ञ डॉ. सुहास वाघ व कुटुंबीय यांनीही जन्मशताब्दीच्या निमित्ताने एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १ | हितचिंतकाडून | ५००१ |
| २ | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| ३ | आई–वडील श्रीमती कमलाबाई व श्री. बाळकृष्ण गणपतराव सुखटणकर, काका श्री. दत्तात्रय गणपतराव सुखटणकर व नातेवाईक श्रीमती रुकमाबाई (ताई मावशी), श्री. विठ्ठलराव इस्लूर, श्री. अच्युत (विनोद) सुब्राव गायतोंडे व श्रीमती कमलाबाई गणपत पालेकर यांच्या स्मरणार्थ श्री. प्रकाश बाळकृष्ण सुखटणकर यांजकडून | ६,००६ |
| ४ | श्री. परमानंद पांडुरंग सोहोनी यांच्या ४० व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. नितीन यांजकडून | १,००१ |
| ५ | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्टकडून २०१५–२०१६ करिता | ६,००० |
| ६ | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,५०१ |
| ७ | एन. के. जी. एस. बी. बँकेकडून २०१५–१६ करिता | २५,००० |
| ८ | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ भाचे सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून | १०,००० |
| ९ | श्री. मंगेश शंकर बोरकर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छापूर्वक एका हितचिंतकाकडून | ५,००१ |
| | दुसऱ्या हितचिंतकाकडून | १,००१ |



| | | |
|---|---|---|
| १० | श्रीमती उमा गोविंद मुझुमदार यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती जयश्री कमलाकर नायक व नात श्रीलक्ष्मी (मेघना) अनिल हट्टंगडी यांजकडून | १०,००० |
| ११ | श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी शिवराव वाघ, श्री. रामकृष्ण शिवराव वाघ व श्रीमती स्नेहलता गोपीनाथ वाघ यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ यांच्या मुलांकडून | २,५०० |
| १२ | श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग व श्रीमती शकुंतला व श्री. त्रिंबक महाबळेश्वर तेलंग यांच्या स्मरणार्थ श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा तेलंग यांच्या नातवंडांकडून | २,००० |
| १३ | श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी शिवराव वाघ, श्री. रामकृष्ण शिवराव वाघ व श्रीमती स्नेहलता वाघ यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुलभा रामकृष्ण वाघ यांच्याकडून | २,५०० |
| १४ | वडील श्री. वसंत मंगेश दुभाषी व आत्या श्रीमती कुसुम मंगेश दुभाषी यांच्या स्मरणार्थ मुले उदिता, ऋग्वेदय व पुष्पक यांच्याकडून | २०,००० |
| १५ | आई व भाऊ यांच्या स्मृती प्रीत्यर्थ भाऊंच्या ९०व्या वाढदिवसाच्या प्रसंगी | ५,००० |

## वृद्धसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| २. | श्रीमती विजया सदाशिव ब्रह्मे यांच्या १ल्या पुण्यतिथी निमित्त बहीण श्रीमती लता देवीदास कसबेकर यांजकडून | १०,००० |
| ३. | श्रीमती इंदिरा व श्री. गजानन अनंत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. शंकर व स्नुषा श्रीमती गिरिजा यांजकडून | १,००१ |
| ४. | हितचिंतकाकडून | ६,००० |
| ५. | श्रीमती रुक्मिणीबाई व श्री. नारायण विठ्ठलराव हिचकड यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. रमेश व स्नुषा सौ. उषा यांजकडून | १,००,००० |
| ६. | श्रीमती इंदु मधुकर मुझुमदार यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी पुत्र सर्वश्री अरुण, अनिल व किशोर आणि कन्या सौ. लता विठ्ठलराव पालेकर यांजकडून | १,००,००० |
| ७. | श्री. माधव रामदास नायक यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती मानसी अजिथ नायक यांजकडून | २,००० |
| ८. | श्रीमती शरदिनी (सरु) गुरुदास वागळे यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी कन्या स्वाती, जामात नीलेश वेलींग व नात श्रावणी यांजकडून | २,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | दिवंगत अमांडा तेजन हिचकड हिच्या स्मरणार्थ सासू-सासरे सौ. उषा व श्री. रमेश नारायण हिचकड यांच्या कडून | १,००,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| २. | श्री. सुरेश भवानीशंकर देसाई यांजकडून | १,००० |
| ३. | श्री. पांडुरंग (नरहरी) विनायक वाघ यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी पुत्र डॉ. सुहास व कुटुंबीयांकडून | १००,००० |
| ४. | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्टकडून २०१५-२०१६ करिता | ६,००० |
| ५. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी याच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,५०० |
| ६. | एन. के. जी. एस. बी. बँकेकडून २०१५-१६करिता | १०,००० |
| ७. | वागळे कुटुंबीयाकडून | १०,००० |
| ८. | श्री. अमरीश अनंत वागळे याजकडून | ६,७०० |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती माधवी मीलन मुझुमदार, अंधेरी | २,००१ |
| २. | श्रीमती रेखा शरद सलगर, ठाणे | १०,००० |
| ३. | श्री. सुमंत मंगेश साखरदांडे, मुलुंड | १०,००० |
| ४. | श्री. गिरीश मधुकर रेगे, नाशिक | ५,००१ |
| ५. | श्री. निशिकान्त लजपत नाडकर्णी, अंधेरी | ५,००१ |
| ६. | श्रीमती मंगला महारुद्र वागळे, मुलुंड | ५,००० |
| ७. | श्रीमती रेखा किरण दाभोळकर, जोगेश्वरी | २,५०० |


## मुंबई मंच देणगीदारांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. सुहासिनी सदानंद नाडकर्णी, माहीम | ७,५०० |
| २. | श्रीमती रेखा किरण दाभोळकर, जोगेश्वरी | २,५०० |
| ३. | श्रीमती सुमंगला शांताराम वैजप्पन, बोरीवली | १,००० |

(उर्वरीत देणग्यांचा तपशील जागेअभावी पुढील अंकी)



Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.